Historicity Research Journal
ISSN : 2393-8900

Impact Factor : 0.4521 (UIF)
Volume - 2 | Issue - 12 | August – 2016

# राजर्षी छ.शाहू महाराजाचे पूरोगामी दृष्टीकोन

डॉ.संजय गायकवाड
विभाग प्रमुख (इतिहास) , मारुतीराव हरीराव महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय मोडनिंब.



**प्रास्ताविक-**

२० व्या शतकाच्या मोठया नेत्यांच्या मालिकेत आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून राजर्षी शाहू महाराज यांची गणना होते. अवघ्या २५ वर्षाच्या कारकिर्दीत संस्थानाची कायापालट केला होता. धार्मिक, राजकिय व सामाजिक चळवळीच्या माध्यमातून बहुजन समाजनिष्ठ राजकारणाची सूत्रे शाहू महाराजांनी हलवली होती. छत्रपती शाहू महाराजांना खंबीर समाजसुधारक, धैर्यवान धर्मक्रांतिकारक, सक्रिय अस्पृश्योद्वारक, मुत्सद्दी राजकारणी, दिनदुबळयांचा प्रकाशदाता, जगप्रसिध्द पैलवान इ. उपाधीने ओळखले जाते. शाहू महाराजांनी जातिसंस्था व धर्मसंस्था याचा अभ्यास करुनच लोकोत्तर कार्य केले होते. राजे सामाजिक, धार्मिक, राजकियदृष्ट्या जहाल विचारसरणीचे होते. त्यांनी ध्येयवादी दृष्टीकोनातून व नियोजनपूर्वक केलेल्या सर्वंकष व बहुविध सुधारणांमुळेच जनतेच्या मनावर परिणाम झाल्यानेच सामाजिक क्रांती घडण्यास मदत झाली आहे. त्यांनी प्रशासन, शिक्षण, कला, क्रीडा, शेती, उद्योगधंदे, आरोग्य आदि क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा आणल्यामुळेच त्यांना विधायक क्रांतिकारक असे म्हणतात.

म. फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर सत्ता बहुजनांच्या हाती येण्यासाठी विचार व कृती केली होती. धार्मिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. शाहू महाराजांची कारकिर्द तर इतिहासाला कलाटणी देणारीच ठरली. त्यांनी ध्येयवादी दृष्टीकोनातून व नियोजनपूर्वक केलेल्या सर्वंकष व बहुविधी सुधारणेमुळेच जनतेच्या मनावर दूरगामी परिणाम झाल्यानेच सामाजिक क्रांती घडून येण्यास मदत झाली. शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळ, शैक्षणिक चळवळ, सामाजिम समतेची चळवळ, राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ, त्याचप्रमाणे राधानगरी धरण, प्रशासकिय आरक्षण, जातवारर विद्यार्थी वसतिगृह, क्षात्रजगद्‌गुरु धर्मपीठ इ. क्रांतिकारक प्रकल्पांमुळे सर्व क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडून आलेला दिसतो.

**शाहू महाराजांचे कार्य :-**

१) **धर्ममार्तंडांना विरोध -** हिंदू समाजातील उन्मत सनातनी धर्ममार्तंडांच्या विरोधात आपल्या आयुष्यातील पहिले बंड पुकारले. माणसाचे माणूसपण हिरावून टाकणारी धर्मसंस्थाने नष्ट करण्याचा प्रत्यक्ष कृतीतून प्रयत्न केला.

२) **राखीव जागा -** आपल्या संस्थानात नोकरीत ५०% जागा राखीव ठेवणारा हिंदुस्थानातील एकमेव संस्थानिक होय. समता व स्वातंत्र्याचा विचार त्यांनी प्रत्यक्ष कार्यवाहीत करण्याचे लाख मोलाचे कार्य आयुष्याच्या अखेरपर्यंत केले.

३) **वेदोक्त प्रकरण -** वेदोक्त प्रकरणांमुळे महाराजांनी सामाजिक व धार्मिक विचारसरणीत आमुलाग्रह बदल घडवून आणला.

४) **सत्यशोधक चळवळ -** छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी विद्यार्थी दशेपासूनच अनिष्ठ प्रथेच्या विरुध्द विरोध केला होता. धर्ममार्तंड यांची अरेरावी आणि अहंकार स्वतः राजाला अनुभवाला आल्याने त्यांनी हिंदू धर्मातील शूद्रातीशूद्रांची होणारी आर्थिक, धार्मिक व सामाजिक विकासाचे कार्य सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून त्यांनी सुरु केले. सत्यशोधक चळवळ म. फुलेंच्या मृत्यूनंतर अंतर्गत कलहाने मृतवत झाली होती. अशा स्थितीत मुंबई, पुणे, बडोदा, कोल्हापूर, नाशिक, सातारा, मराठवाडा, खानदेश येथील निष्ठावंत कार्यकर्ते ही चळवळ वाढवत होते. अशा स्थितीत १९१० मध्ये महर्षी वि.रा. शिंदेंनी मुंबईला सत्यशोधक समाजाची परत स्थापना केली. कोल्हापूरातही सत्यशोधक समाजाची स्थापना होत आहे हे पाहून राजे स्वतः जातीने हजर झाले.

**सत्यशोधक सदस्याची शपथ :-**

"सर्वच मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत सबब ती माझी भांवडे आहेत अशा बुध्दीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अगर ध्यानधारणा करतेवेळी अगर धार्मिक विधीचे वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. परमेश्वरास व सत्यरुपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. ह्या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्याचे तो मला सामर्थ्य देईल. अशाप्रकारे आयुष्यक्रम घालविण्यासाठी तो मला योग्यप्रकारे मदत करो."

या प्रतिज्ञेला हेतू उदार आहे, समतेचा विचार, ज्ञानाचा पुरस्कार आणि धर्म व ईश्वरविषयक व्यापक जाणीव यात आहे.

**सत्यशोधक समाजाची तीन प्रमुख तत्त्वे :-**

१) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्विकार, निगुण, व सत्यरुप आहे. सर्व मनुष्यप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

२) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनवण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरुरी नसतेच त्याप्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ती करण्यास भट, दलालाची मुळीच आवश्यकता नाही.

३) मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसून, तो गुणाने श्रेष्ठ ठरतो.

**सत्यशोधक चळवळीचे कार्य :-**

कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना होत आहे हे पाहून राजर्षी शाहू महाराजांनी जातीने लक्ष दिले होते. रावबहाद्दूर डोंगरे विठ्ठल ढोणे यांना राजदरबारी नोकरी करीत असतानाही सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी मुक्त केले. कोल्हापूरात छत्रपती शाहूंच्या कृपेने सत्यशोधक समाजाचे काम जोमात सुरु होते.

**१)** **धार्मिक वर्गाचे प्रशिक्षण वर्ग -** सत्यशोधक समाजासाठी स्वतःची जागा व समाजाच्या तत्त्वानुसार धार्मिक विधी करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरु केले.

**२)** **मोफत ग्रंथालय -** सत्यशोधक समाजाची विचारप्रणाली आचार लोकांपर्यंत पोहचण्यासाठी त्यांची माहिती असलेले ग्रंथ उपलब्ध करुन ते सर्वांना मोफत मिळण्याची सोय उपलब्ध करुन दिली.

**३)** **आठवड्याची व्याख्यानमाला -** राजर्षी छत्रपती शाहू महाराजंनी पगारी नोकरांच्या माध्यमातून प्रत्येक गावात आठवडी व्याख्यानमाला आयोजित करुन सत्यशोधक चळवळीचा प्रचार बहुजन समाजापर्यंत केला.

**४)** **राखीव जागांचा जाहिरनामा -** बहुजन समाज, शूद्र समाज यांना सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी राखीव जागांचा जाहिरनामा प्रसिध्द करुन तो योग्यप्रकारे अंमलात आणण्याची खबरदारी राजर्षी छ. शाहू महाराजांनी घेतलेली होती. त्यांनी स्वातंत्र्याचा आणि समतेचा विचार आपला उच्चार आणि आचार यांची त्यांना मनोमन खात्री पटल्याने त्यांनी पहिला क्रांतिकारक निर्णय म्हणजे संस्थानाच्या दरबारातील नोकरीत असलेल्या मागासलेल्या जातींना राखीव जागांचा जाहिरनामा प्रसिध्द केला होता.

भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, आण्णासाहेब लट्टे हे छत्रपतींच्या दरबारी नोकरी सांभाळून विचारांचा प्रचार व प्रसार खेड्यापाड्यातही करीत होते. छत्रपतींमुळेच कुरुंदवाड, सातारा, ठाणे या भागात चळवळीचे कार्य वाढले. म. फुलेंनी बहुजनांच्या जीवनात प्रबोधनाची आणि प्रगतीची पहिले पहाट फुलविली ! माणसाला माणसासारखे जगू दया, त्याला सनातनी धर्माच्या मगरमिठीत चिरडू नका, वर्णवर्चस्वाचा बागलबुवा उभ करुन त्याला सतत भयग्रस्त करुन टाकू नका ! देवाधर्माच्या नावाखाली माणसांना जनावरांचे जिणे जगण्याची पाळी आणू नका. दुर्बलातील दुर्बल देखील ताठ मानेने जगला पाहिजे हाच म. फुल्यांचा ध्यास होता व त्यांचे स्वप्न होते. समतेसाठी व स्वातंत्र्यासाठी राजसिंहासन दूर ठेवण्याची त्यांची तयारी होती. म. फुले यांचे बहुजन हिताय बहुजन सुखाय या विचाराची पताका खांद्यावर घेवून वाटचाल सुरु केली होती. म्हणूनच या समतेच्या दिंडीत शाहू महाराज अग्रभागी राहून सत्यशोधक समाजाचा ध्वज आपण आपल्या खांद्यावर पुढे नेणार हे जाहिर केले. म्हणूनच सत्यशोधक चळवळ सर्वसामान्यापर्यंत पोहचली.

"योगेश्वर फुल्यांनी सत्यशोधकाच्या मिषाने जनतेच्या कल्याणाचा योग निर्माण केला खरा पण त्याचा राष्ट्रभर फैलाव व्हावयाला एखाद्या धर्नुधारी पार्थाची जोड शाहू महाराजांच्या रुपाने प्राप्त झाली" - श्रीपतराव कुलकर्णी.

छत्रपती शाहूंनी सत्यशोधक चळवळीचे कार्य आयुष्याच्या अखेरपर्यंत केले. त्यांच्यासारखे बहाद्दूर मुत्सदीमुळेच सत्यशोधक चळवळ वाढली. सत्यशोधक चळवळीत सहिष्णू, बुध्दीवादी जनता आकर्षित झाले. कारण समाजाचा आधुनिक ज्ञान व विज्ञानावर विश्वास होता. म्हणूनच अस्पृश्यता, जातीयता दूर करण्यासाठी आयुष्यभर कष्ट घेतले. महाराजांनी सत्यशोधक विचाराची बांधीलकी अधिक स्पष्ट होते. त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिध्द झालेल्या वृत्तपत्रातून स्पष्ट होते. त्यांनी केलेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणेमुळेच अखिल जगात त्यांचे नाव आजही अमर आहे.

**निष्कर्ष :-**

१) राजर्षी छ. शाहू महाराजांनी ध्येयवादी दृष्टीकोनातून नियोजनपूर्वक सामाजिक व धार्मिक सुधारण घडवून आणल्या.

२) राजर्षी छ. शाहू महाराजंनी स्वातंत्र्य व समानता हे तत्त्व प्रत्यक्ष विचार व कृतीतून जगाला दाखवणारे ते पहिले व शेवटचे संस्थानिक होते.

३) राजर्षी छ. शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीची पुर्नस्थापना करुन त्याचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले.

४) राजर्षी छ. शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून बहुजनाला नवा दृष्टीकोन दिला.

**संदर्भ ग्रंथ यादी :-**


१) डॉ. जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१.

२) डॉ. रमेश जाधव- लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, १९९७.

३) माधवराव बागल (संपादक), सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, श्री शाहू सत्यशोधक समाज, कोल्हापूर.

४) म. दि. फडके, शाहू छत्रपती आणि लोकमान्य, कोल्हापूर.